# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/04/2023 (बुधवार) सकाळ


## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा सोनपुर येथे दिनांक ३१/०३/२०२३ चे २०.०० वा. सुमारास **आरोपी नामे– पंकज खुशालराव काळे, वय ३० वर्ष, रा. सोनपुर** याने आपले वडील व फिर्यादी नामे– सौ शिलाबाई खुशालराव काळे, वय ६५ वर्ष, रा. सोनपुर यांचे पति नामे– खुशाल राजाराम काळे यास शेताकरीता व घराकरीता पैसे देण्यास नकार दिल्याने यातील आरोपी याने हातबुक्यांनी डोळयाजवळ मारहाण केली तसेच बाजेवरून खाली ओढुन जमीनीवर आपटले व फिर्यादीच्या पतिला जिवाने मारण्याच्या उद्देशाने छातीवर मारहाण केली व गावातील सोतराज यांनी सावनेर येथे दवाखान्यात घेवुन गेले व प्राथमिक उपचार सावनेर येथे उपचार करून मेडीकल कॉलेज नागपुर येथुन उपचार चालु असता फिर्यादीचे पति हे दि. ३१/०३/२०२३ रोजी मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ३२६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. मनोज खडसे पो.स्टे खापा मो. नं ९५०३२५०३७० हे करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. मौदा:– अंतर्गत टोलनाक्याच्या बाजुला माथनी मौदा येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे १७/३० वा. ते ८/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक सामरावजी पिसे, वय ५५ वर्ष, रा. माथनी यांच्या पोल्ट्रीफॉर्म समोरुन दि. ०३/०४/२०२३ चे ५/३० वा. दरम्यान ७५ लोंखडी टिना किंमती अंदाजे ३७,५००/–रु २० नग टिनाच्या डोंग्या किंमती अंदाजे ८०००/–रु व जुना वापरता इलेक्ट्रॉनीक काटा किंमती अंदाजे ६,०००/–रु असा एकुण किंमती अंदाजे ५१,५००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ११७४ यंगलवार मो. क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बोरी :–** अंतर्गत ०.५ किमी अंतरावर मौजा एमआयडीसी चौक बोरी येथे दिनांक ०४/०४/२०२३ चे १५/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सुनंदा बंडु भोंडे, वय ५० वर्ष रा. मास्टर कॉलनी वर्धा ही स्टार बस मध्ये टाकळघाट येथे जाण्यास बसली असता त्या दरम्यान यातील आरोपी एक अनोळखी महिला वय अंदाजे २० ते २५ वर्ष हिने फिर्यादीचे हॅंडबॅग मधुन सोन्याचा गोप ०७ ग्रॅम किंमती अंदाजे १४,०००/– रू. अर्धा ग्रॅम चे लॉकेट सोन्याचे किंमती अंदाजे १,०००/– रू. व नगदी २,०००/– रू. असा एकुण १७,०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/८३९ वासनिक मो. ९११९४६८१०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**